# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date 18 February 2025
## Time 11.00 to 11.05 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: १८ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११.०० वाजता.

****

परीक्षा पे चर्चा २०२५ या कार्यक्रमाचा नवीन भाग आज प्रसारित करण्यात येणार आहे. यामध्ये विविध परीक्षा मंडळांच्या परीक्षेत प्रथम आलेले यशस्वी विद्यार्थी आपले अनुभव सांगणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर याबद्दलची एक ध्वनिचित्रफित प्रसारित केली आहे.

****

राष्ट्रीय नागरी भूस्थानिक आधारित जमीन सर्वेक्षण अर्थात नक्शा या उपक्रमाचं उद्घाटन आज ग्रामविकास मंत्री शिवराज सिंग चौहान यांच्या हस्ते होणार आहे. याअंतर्गत २६ राज्यांमधल्या नागरी भागात भूसर्वेक्षण केलं जाणार आहे. शहरी भागात जमिनीच्या मालकीचे अचूक आणि विश्वासार्ह तपशील तयार व्हावेत यासाठी जमिन नोंदणी करणं आणि माहिती अद्ययावत करण्याचं काम केलं जाईल. माहिती तंत्रज्ञानावर आधारित या यंत्रणेमुळे पारदर्शकता, कार्यक्षमता वाढेल आणि शाश्वत विकासालाही त्याचा हातभार लागेल असं ग्रामविकास मंत्रालयानं नमूद केलं आहे. महाराष्ट्रातल्या १० स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये हे सर्वेक्षण होणार असून, त्यात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कन्नड, तसंच बुलडाणा नगर परिषद क्षेत्राचा समावेश आहे.

****

देशाचे नवे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून ज्ञानेश कुमार यांची निवड झाली आहे. सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांचा कार्यकाळ आज संपत आहे. ज्ञानेश कुमार हे १९८८च्या केरळ तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. डॉ विवेक जोशी यांची नवे निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते १९८९ सालच्या हरियाणा तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत.

****

२०२४-२५ या आर्थिक वर्षात भारताच्या निर्यातीत सात पूर्णांक २१ टक्के, तर आयातीत एप्रिल ते जानेवारी या कालावधीत आठ पुर्णांक ९६ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, या कालावधीत एकंदर निर्यात सुमारे ६८३ अब्ज अमेरिकन डॉलर्स झाली, तर आयात एकंदर ७७० अब्ज अमेरिकन डॉलर्स आहे.

****

एसबीआय म्युच्युअल फंडने अवघे २५० रुपये गुंतवता येतील, अशा SIP ला काल सुरुवात केली. सर्व महत्त्वाच्या गुंतवणूक व्यासपीठांच्या आधारे SBI म्युच्युअल फंडाच्या विविध योजनात किमान अडीचशे रुपये SIP द्वारे गुंतवता येतील. याचा फायदा नवीन गुंतवणूदार, असंघटित क्षेत्रातले कामगार तसंच छोट्या बचतीसाठी इच्छुक असणाऱ्यांना होईल, अशी अपेक्षा कंपनीने व्यक्त केली आहे.

****

भारतातून ऑस्ट्रेलियाला पहिल्यांदाच समुद्रमार्गे डाळिंबांची निर्यात करण्यात आली. अपेडा अर्थात कृषी आणि प्रक्रिया केलेले अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणानं सोलापूरमधल्या डाळिंबांची ही निर्यात केली. यामुळे वाहतूक खर्चात मोठ्या प्रमाणात बचत झाली आहे. गेल्यावर्षी जुलैमध्ये पहिल्यांदा हवाईमार्गे निर्यात झाली होती.

****

मंदिरं ही श्रद्धास्थानं आहेतच, पण, ती पूर्वीसारखीच पुन्हा सामाजिक समतेची केंद्र व्हावीत, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. तिरुपती इथं आयोजित आंतरराष्ट्रीय मंदिर परिषद आणि प्रदर्शनात ते काल बोलत होते. आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, आचार्य गोविंददेव गिरी महाराज, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. परकीय आक्रमणांच्या काळात देशभरात मंदिर आणि घाटांचं पुननिर्माण करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं हे ३००वं जयंतीवर्ष आहे; त्यावर्षात हे आयोजन होत आहे, हा अतिशय चांगला योग असल्याचं, फडणवीस म्हणाले.

****

मराठी भाषा विभागानं मराठी साहित्य दृकश्राव्य माध्यमांवर उपलब्ध करून द्यावं, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. मराठी भाषा विभागाच्या बैठकीत ते काल बोलत होते. मराठी भाषेचं जतन, संवर्धन आणि प्रचारासाठी विविध आधुनिक उपक्रम राबवण्याच्या सूचना त्यांनी केल्या. मराठी साहित्याचा प्रसार

होण्यासाठी प्रत्येक बृहमंडळाला ५०० मराठी पुस्तकं प्रदान करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

****

प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियान अर्थात पीएम आशा योजनेअंतर्गत शेतमालाच्या किमान आधारभूत किमतीचा अभ्यास करण्यासाठी आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारनं एका समितीची स्थापना केली. ही समिती सध्या अस्तित्वात असलेल्या यंत्रणेचं मूल्यांकन करेल आणि राज्यभरात हमीभावाची अंमलबजावणी सुरळीतपणे व्हावी यासाठी धोरणांची शिफारस करेल. महाराष्ट्र राज्य सहकारी विपणन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक या समितीचे अध्यक्ष असतील.

****

पाण्याची मागणी गेल्यावर्षीपेक्षा कमी असल्याने सिंचन अधिक प्रभावी होईल याची दक्षता जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी घ्यावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी साताऱ्यात दिले. धरणातलं पाणी सर्वांना विश्वासात घेऊन वितरित करावं, कोणताही वाद होणार नाही याची खबरदारी घ्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

****